
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक







भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**


● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १४ वे ● अंक ५०४ वा ● सोमवार, ता. २६ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००





## तूर उत्पादकांना मोठा दिलासा; २,६९६ कोटींच्या तूर खरेदीला मंजुरी

**नवी दिल्ली | रयत समाचार**

महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. केंद्र सरकारने राज्यातील ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला मंजुरी दिली असून, ही खरेदी किंमत समर्थन योजना (PSS) अंतर्गत सुमारे २,६९६ कोटी रुपयांच्या निधीतून केली जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो तूर उत्पादक शेतकऱ्यांना थेट आर्थिक लाभ मिळणार. नवी दिल्ली येथे पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या खरेदीस मंजुरी दिली. बैठकीला महाराष्ट्राचे पणन मंत्री जयकुमार रावल तसेच केंद्रीय कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे अधोरेखित करत मंत्री चौहान म्हणाले, केंद्रावर मोठा आर्थिक भार पडत असला तरी शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळणे ही सरकारची प्राथमिकता आहे. ही खरेदी प्रक्रिया नेफेड (NAFED) आणि एनसीसीएफ (NCCF) यांच्या माध्यमातून राज्य सरकारच्या समन्वयाने राबवली जाणार आहे. शेतकऱ्यांकडून थेट खरेदी होईल, त्यामुळे दलालांचा हस्तक्षेप टाळला जाईल आणि सरकारचा पैसा मूळ उत्पादकांपर्यंत पोहोचेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. शेतकऱ्यांची नोंदणी सुलभ व्हावी, कोणतीही अडचण येऊ नये, तसेच गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या वाढवावी, यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. या निर्णयामुळे बाजारातील भावघसरणीपासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळणार असून, तूर उत्पादकांना हमीभावाचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठीही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

### शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टतेचा सन्मान

## मेस्टाचे राज्यस्तरीय अधिवेशन ३१ जानेवारीला

**कोपरगाव | किसन पवार**

महाराष्ट्रातील इंग्रजी माध्यम शाळा चालवणाऱ्या संस्थाचालकांची एकमेव राज्यस्तरीय संघटना असलेल्या महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन (मेस्टा) चे ११ वे भव्य राज्यस्तरीय अधिवेशन येत्या ३१ जानेवारी २०२६ रोजी आत्मा मलिक ध्यानपीठ संस्था, कोकमठाण येथे आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तायडे यांनी दिली. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान डॉ. संजय तायडे भूषविणार असून, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, उत्तर महाराष्ट्र शिक्षक मतदारसंघाचे आमदार किशोर दराडे, भाजपचे राज्य उपाध्यक्ष अनिल गावंडे, तसेच मेस्टाचे प्रदेश अध्यक्ष डॉ. नामदेवराव दळवी, राज्य कार्यकारणी प्रमुख विनोद कुलकर्णी, अभिजित देशमुख, अनिल असलकर, विश्वजित चव्हाण, मनिष हांडे, शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी, हजारो शिक्षक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनात शैक्षणिक गुणवत्ता वाढ, इंग्रजी शाळांसमोरील अडचणी तसेच शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक मुद्द्यांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. संघटनेच्या वतीने शाळांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची सविस्तर मांडणी मंत्र्यांसमोर करण्यात येणार असून, त्यावर सकारात्मक तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याचबरोबर शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जीवनगौरव पुरस्कार, तसेच उत्कृष्ट संस्था, संस्थाचालक, प्राचार्य आणि शिक्षक यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. अधिवेशनाच्या निमित्ताने भव्य शैक्षणिक प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनाचा लाभ जास्तीत जास्त संस्थाचालक, पालक, शिक्षक व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिवेशनासाठी आत्मा मलिक ध्यानपीठ संस्थेच्या वतीने जय्यत तयारी सुरू असून, याबाबतची माहिती संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांनी दिली. या आयोजनात संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे तसेच शैक्षणिक व्यवस्थापक सुधाकर मलिक हे नियोजन व मार्गदर्शन करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# बीबीसीचे ज्येष्ठ पत्रकार सर मार्क टली यांचे निधन

## भारत समजून घेणारा ब्रिटिश आवाज शांत

## भारतीय पत्रकारितेच्या एका युगाचा अंत

**नवी दिल्ली | रयत समाचार**

भारतीय समाज, राजकारण आणि सामान्य माणसांचे जीवन जगासमोर प्रामाणिकपणे मांडणारे बीबीसीचे माजी भारतप्रमुख, ज्येष्ठ पत्रकार व लेखक सर मार्क टली यांचे २५ जानेवारी रोजी नवी दिल्लीतील एका खासगी रुग्णालयात निधन झाले, ते ९० वर्षांचे होते, अशी माहिती त्याचे सहकारी सतीश जेकब यांनी दिली. त्यांच्या निधनाने आंतरराष्ट्रीय पत्रकारितेतील एक संवेदनशील, निर्भीड आणि भारताशी आत्मीय नाते जपणारा अध्याय कायमचा संपला. मार्क टली हे केवळ परदेशी वार्ताहर नव्हते, तर भारताला आतून समजून घेणारे आणि जगाला तो समजावून सांगणारे पत्रकार होते. अनेक पिढ्यांसाठी भारताचा आवाज ठरलेले टली बीबीसीच्या पत्रकारितेतील 'गोल्ड स्टँडर्ड' काळाचे प्रतिनिधी मानले जातात. विशेषतः बीबीसीच्या गाजलेल्या From Our Own Correspondent या रेडिओ कार्यक्रमातील त्यांचे वृत्तनिवेदन अचूकता, संयम आणि सखोल निरीक्षणासाठी ओळखले जात होते. त्या काळात माध्यमे अधिक जबाबदार आणि विश्वासार्ह होती, आणि बीबीसीवर जागतिक स्तरावर असलेला विश्वास हा टली यांच्यासारख्या पत्रकारांमुळेच दृढ झाला होता.




(छाया– बीबीसी न्यूज हिंदी)

१९३५ साली कोलकाता येथे जन्मलेल्या मार्क टली यांनी भारताला समजून घेण्याची जिज्ञासा पत्रकारितेत रूपांतरित केली. भारतातील राजकीय उलथापालथी, सामाजिक संघर्ष, धर्म, ग्रामीण वास्तव आणि सामान्य माणसांचे प्रश्न हे त्यांच्या पत्रकारितेचे केंद्र होते. १९७५ मध्ये भारतात आणीबाणी लागू झाल्यानंतर परदेशी पत्रकारांना देश सोडण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यात मार्क टली यांचाही समावेश होता. मात्र भारताशी असलेले त्यांचे नाते इतके दृढ होते की, तब्बल १८ महिन्यांनंतर ते पुन्हा भारतात परतले आणि अधिक तीव्रतेने, अधिक सखोलपणे भारतीय वास्तवाचे वार्तांकन करू लागले. आणीबाणीचा काळ, पंजाबमधील अस्थिरता, शीख संघर्ष, ऑपरेशन ब्लू स्टार यांसारख्या संवेदनशील आणि राजकीयदृष्ट्या ज्वलंत विषयांवर त्यांनी निर्भीड पण संतुलित वार्तांकन केले. घटनांची केवळ माहिती देण्यापेक्षा, त्या घटनांच्या मागचा देश, समाज आणि मानसिकता त्यांनी सातत्याने जगासमोर आणली. सत्तेच्या चौकटीत अडकून न राहता सामान्य भारतीयांचे जगणे, त्यांचे प्रश्न आणि त्यांच्या अपेक्षा हे त्यांच्या पत्रकारितेचे खरे बळ होते. बीबीसीमधून निवृत्ती स्वीकारल्यानंतरही त्यांनी पत्रकारिता सोडली नाही. स्वतंत्र पत्रकार आणि लेखक म्हणून त्यांनी भारतावर आधारित अनेक गाजलेली पुस्तके लिहिली. No Full Stops in India, The Heart of India, India in Slow Motion, Amritsar: Mrs Gandhi's Last Battle ही पुस्तके आजही भारताची नाडी पकडणारी मानली जातात. तसेच From Raj to Rajiv आणि – Non-Stop India या ग्रंथांतून त्यांनी सत्ताकेंद्रांबरोबरच सामान्य लोकांच्या जीवनाचे प्रभावी चित्रण केले. सर मार्क टली यांच्या पत्रकारितेने अनेकांना भारत पाहण्याची आणि समजून घेण्याची प्रेरणा दिली. ब्रिटनमधील अनेक श्रोते आणि वाचक सांगतात, किशोरवयापासून टली यांचे वार्तांकन ऐकत ते भारताकडे ओढले गेले. ब्रिटिश नागरिक निक् बाल्मेर यांनी व्यक्त केलेल्या भावना याचे प्रातिनिधिक उदाहरण

**३१ ऑक्टोबर १९८४ हा भारतीय इतिहासातील अत्यंत धक्कादायक दिवस. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची हत्या झाल्याची बातमी जगाला सर्वप्रथम देणारे पत्रकार म्हणून मार्क टली यांचे नाव इतिहासात नोंदले गेले. त्या क्षणी दिलेले त्यांचे निवेदन आजही पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात उदाहरण म्हणून दिले जाते.**

आहेत. टली यांच्या अचूक आणि प्रभावी रिपोर्टिंगमुळेच १९७८ साली भारतभ्रमण करण्याची प्रेरणा मिळाली, आणि त्यांनी ज्या ठिकाणांहून वार्तांकन केले, ती ठिकाणे प्रत्यक्ष पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली, असे बाल्मेर यांनी नमूद केले त्या काळातील माध्यमांची विश्वासार्हता आणि बीबीसीची प्रतिष्ठा आजच्या तुलनेत किती उच्च होती, याची आठवणही त्यांनी करून दिली आहे. परकीय असूनही भारतीय समाजाच्या विविध स्तरांत त्यांना प्रचंड मान मिळाला. आज भारतीय माध्यमांतून उमटणाऱ्या श्रद्धांजली, स्मरणलेख आणि प्रतिक्रिया या त्यांच्या कार्याची पावती देणाऱ्या आहेत. "मी जन्माने ब्रिटिश असलो, तरी मनाने भारतीय आहे," असे ते अनेकदा सांगत,

**मार्क टली यांच्या वार्तांकनशैलीचा प्रत्यय देणारा एक व्हिडीओ आजही उपलब्ध असून, त्यातून त्यांच्या आवाजातील संयम, स्पष्टता आणि पत्रकारितेचा दर्जा दिसून येतो. व्हिडीओ लिंक** https://www.youtube.com/watch?v=bt9g30evQvs

**सर मार्क टली यांचा व्हिडीओ पहाण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.**

आणि त्यांच्या कार्यातून ते सातत्याने दिसून आले. सर मार्क टली यांच्या निधनाने केवळ एक पत्रकार नाही, तर भारत आणि जग यांच्यातील एक विश्वासार्ह दुवा हरपला आहे. त्यांच्या लेखनातून, वार्तांकनातून आणि दृष्टिकोनातून भारताची कथा जगापर्यंत पोहोचत राहील. भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात त्यांचे नाव सदैव आदराने, संदर्भाने आणि कृतज्ञतेने घेतले जाईल.

## आदित्य साठे यास ॲथलेटिक्समध्ये राष्ट्रीय सुवर्णपदक

**गोवा | रयत समाचार**

भारतीय युवा खेल परिषद अंतर्गत गोवा येथे पार पडलेल्या नॅशनल गेम्स २०२५-२६ स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याचा सुपुत्र आदित्य अशोक साठे याने ॲथलेटिक्समधील लांब उडी स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. ता. २०, २१ व २२ जानेवारी रोजी गोव्यातील पोद्दम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, मापुसा येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशातील विविध राज्यांमधील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेत आदित्यने दमदार कामगिरी करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर १२ वी वर्गात विद्यार्थी असून, राणा सिंग व शंकर गायकवाड पाटील यांच्या हस्ते त्याला ट्रॉफी व पदक प्रदान करण्यात आले. धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील चिंचपुर(बु.)येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आदित्यच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आई-वडील शेती करून कुटुंबाचा गाडा चालवतात. आईवडील,आजी एक बहिण असे एकत्र कुटुंब असलेल्या घरातून राष्ट्रीय सुवर्णपदक विजेता घडल्याने गावात आनंदाचे वातावरण आहे. यशाबद्दल रेसिडेन्शिअल कॉलेजचे दादासाहेब वांढेकर यांनी आदित्यचे विशेष अभिनंदन केले असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. आदित्यच्या या सुवर्णयशाने धाराशिव जिल्ह्याचा क्रीडाक्षेत्रातील लौकिक आणखी वाढला आहे.




## समरसता बालकुमार साहित्य संमेलनाध्यक्षपदी शोभा जोशी

**पिंपरी | प्रदीप गांधलीकर**

१३ व्या समरसता बालकुमार साहित्य संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका शोभा जोशी यांची निवड करण्यात आली आहे. शुक्रवारी ता. ३० जानेवारी २०२६ रोजी खिंवसरा पाटील शिक्षण संकुल, गणेशनगर, थेरगाव येथे संपन्न होणाऱ्या या एकदिवसीय बालकुमार साहित्य संमेलनाचे उद्घाटन आ. शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात येणार असून स्वागताध्यक्ष म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश गोरडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते संतोष निंबाळकर व नवनिर्वाचित नगरसेविका शालिनी गुजर यांची प्रमुख उपस्थिती राहील. ३० जानेवारी रोजी सकाळी ०९:३० वाजता शाळेच्या आवारात ग्रंथदिंडीने संमेलनाचा प्रारंभ करण्यात येणार असून उद्घाटन सत्रानंतर अनुक्रमे विवेकानंद सुतार, संगीता पुराणिक, राजन लाखे आणि अश्विनी बाविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली सद्भावना सत्र, विद्यार्थी कविसंमेलन, विद्यार्थ्यांशी साहित्य गप्पा आणि कथाकथन या सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ साहित्यिका शोभा जोशी यांनी आजवर मुलांसाठी अनेक बालकविता, गाणी लिहिली असून त्यांचा डब्यातला लाडू हा बालकवितासंग्रह प्रसिद्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांना मंच उपलब्ध व्हावा या उद्देशाने समरसता साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समरसता साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखाध्यक्षा मानसी चिटणीस यांनी केले आहे.



## श्रद्धा, त्याग आणि मानवतेचा संगम

## शीख गुरुपरंपरेचा ऐतिहासिक सोहळा




**नांदेड | रयत समाचार**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी वर्षपूर्तीचा तसेच श्री गुरु गोविंद सिंहजी यांच्या ३५० व्या गुरुता गद्दी समागमचा पवित्र सोहळा नांदेडमध्ये अत्यंत भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत सहभागी होण्याचा सन्मान लाभल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. यावेळी पवार म्हणाले, धर्मस्वातंत्र्य, सत्य, त्याग आणि मानवतेसाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या गुरु तेग बहादुर साहिब जींचा सर्वोच्च बलिदानाचा आदर्श आजही समाजाला दिशा देणारा आहे. अन्यायाविरुद्ध लढा देत धर्म, देश आणि समाजासाठी नवी वाट निर्माण करणारे गुरु गोविंद सिंहजी यांचे कार्य प्रत्येक पिढीसाठी प्रेरणास्रोत ठरते. शीख परंपरेतील या महान गुरूंच्या स्मृतींना उजाळा देणारा हा सोहळा धार्मिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि मानवी मूल्यांची जाणीव अधिक दृढ करणारा ठरला. नांदेडच्या पवित्र भूमीत पार पडलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भाविकांच्या मनात श्रद्धा आणि अभिमानाची भावना निर्माण केली.

### खंडणीसाठी मनमाड महामार्ग अडवला

## गडकरींनी थेट फोन करून झापले; विखे पाटलांचा गौप्यस्फोट

**अहमदनगर | रयत समाचार**

नगरमनमाड महामार्गाच्या रखडलेल्या कामामागे खंडणीखोरी आणि राजकीय हस्तक्षेप कारणीभूत असल्याचा खळबळजनक आरोप पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला. महामार्गाचे काम दीड वर्षांत पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करतानाच त्यांनी मागील ठेकेदार खंडणीच्या दबावामुळे पळून गेल्याचा दावा केला. विखे पाटील म्हणाले, यापूर्वीच्या ठेकेदाराकडे काही लोकांनी खंडणी मागितली. त्यामुळे तो काम सोडून गेला. सध्याच्या ठेकेदारालाही एका लोकप्रतिनिधीने पैसे मागितले. अखेर ठेकेदाराने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे तक्रार केली. यानंतर गडकरी यांनी संबंधित लोकप्रतिनिधीला थेट फोन करून 'हे काय धंदे करता?' असा सवाल केल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. 'तो लोकप्रतिनिधी कोण आहे, हे सर्वांनाच माहिती आहे,' असे सूचक विधान करत त्यांनी नाव घेणे टाळले. या आरोपांमुळे महामार्ग प्रकल्पातील भ्रष्टाचार, खंडणीखोरी आणि राजकीय दबाव या मुद्द्यांवर पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे. प्रशासन आणि यंत्रणांनी याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



# नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

## प्रभाग हरित करण्याचा संकल्प



**अहमदनगर । रयत समाचार**

सथ्था कॉलनी येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा भव्य वृक्षारोपण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रभाग क्रमांक १३ व १४ मधील नवनिर्वाचित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक गणेश भोसले, अविनाश घुले, प्रकाश भागानगरे, सुरेश भाऊ बनसोडे, अनिता शेटीया, सुजाता पडोळे, सुनिता फुलसौंदर, मीना चोपडा यांचा सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यानंतर वृक्षारोपणही करण्यात आले.

यावेळी सुरेश भाऊ बनसोडे म्हणाले, प्रभागामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून हरितक्रांती घडवून स्वच्छ व सुंदर प्रभाग निर्माण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करत सांगितले की, नगरसेवकांनी आपल्या कामातून नागरिकांचा विश्वास संपादन करावा आणि नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. एकाच प्रकारची झाडे न लावता विविध जातींची झाडे लावून त्यांचे संगोपन करणे अत्यंत आवश्यक आहे. ही झाडे पुढील पिढी तसेच पशुपक्ष्यांसाठी उपयुक्त ठरली पाहिजेत, असे त्यांनी नमूद केले. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील ३५ डोंगरांचे नामकरण करून तेथे मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात येणार असल्याचे सांगितले. आगडगाव येथे विश्वस्त मंडळाशी संवाद साधून पूजेमध्ये रोप देण्याची संकल्पनाही मांडण्यात आली असून, भक्तांनी ते रोप घरी संगोपन करावे, असा संदेश देण्यात येत आहे. या उपक्रमाचे एपिसोड महाराष्ट्रभर दाखवण्यात येणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. शेवटी त्यांनी सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अहिल्यानगर शहरात पुणे-मुंबईच्या धर्तीवर रुंद रस्ते, विद्युत दिवे, उद्याने, क्रीडांगणे तसेच विविध विकासकामे सुरू आहेत. महानगरपालिकेच्या माध्यमातून सुमारे ३० कोटी रुपये खर्चाचे जिजामाता रुग्णालय उभे राहत असून, येत्या दोन ते तीन महिन्यांत त्याचे उद्घाटन होणार आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य नियोजन करण्यात येत असून, आगामी काळात अधिक गतीने विकासकामे केली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास राजेंद्र चोपडा, अमोल जाधव, आदेश चंगेडिया, गिरीश अग्रवाल, अमित पोखरणा, महेश मुनोत, विकी जगताप, केतन मुनोत, लालचंद मुनोत, विजू शेठ गुगळे, अनिल पोखरणा, लक्ष्मीभाई सावळा, दीपक अग्रवाल, प्रा. माणिक विधाते, विपुल शेटीया, गोरख पडोळे आदी मान्यवरांसह महात्मा फुले मित्र मंडळाचे पदाधिकारी व प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# 'नेक्सजेन २०२६' प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे - आ. संग्राम जगताप

**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर कॉलेजमधील बीबीए तसेच व्ही. एम. बिझनेस मॅनेजमेंट विभागाच्या वतीने आयोजित 'नेक्सजेन २०२६' मॅनेजमेंट एक्झिबिशनला विद्यार्थी व नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. या प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी बीबीए विभागप्रमुख डॉ. तुषिता अय्यर यांनी आमदार जगताप यांचे स्वागत व सत्कार केला. याप्रसंगी बोलताना आमदार संग्रामभैय्या जगताप म्हणाले, आजची युवा पिढी ही उद्याच्या भारताचे भविष्य आहे. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान नव्हे तर योग्य मार्गदर्शन व व्यावहारिक अनुभव मिळणे अत्यंत आवश्यक आहे. 'नेक्सजेन २०२६' सारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे मिळतात, तसेच व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. या प्रदर्शनाचे यशस्वी नियोजन सर्व प्राध्यापकांनी केले असून महिला प्राध्यापक कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत, हे या उपक्रमातून अधोरेखित झाल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रदर्शनात ५० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले होते. यामध्ये कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स, परफ्युम, ज्वेलरी, बेकरी तसेच विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स सहभागी झाले होते. हे प्रदर्शन दरवर्षी विद्यार्थ्यांच्याच पुढाकाराने आयोजित केले जाते. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण, व्यवस्थापन कौशल्ये व प्रत्यक्ष अनुभव मिळावा, हाच या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. बीबीए विभागातील सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमासाठी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. शीतल कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. भालसिंग, डॉ. प्रो. बेदरकर, रजि. भिंगारदिवे मॅडम, नॉन-ग्रँट विभागाचे प्रमुख डॉ. रझाक फ ुगार, प्रा. घुले सर, प्रा. संदीप साळवे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच 'नेक्सजेन २०२६' प्रदर्शनाने विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय क्षमतेला व्यासपीठ उपलब्ध करून देत शैक्षणिक उपक्रमासोबतच सामाजिक सहभागही वाढवला, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन ; पालकांचा सहभाग



**अहमदनगर । रयत समाचार**

नालेगाव येथे भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने राष्ट्रीय बालिका दिन व आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत मुलींसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे सरचिटणीस सुनील सकट यांच्या पुढाकाराने हा सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. समाजातील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि भविष्यात त्या विविध क्षेत्रात यशस्वी व्हाव्यात, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील महिला, मुली व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सुनील सकट म्हणाले, राष्ट्रीय बालिका दिन व आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन हे केवळ औपचारिक साजरे करण्याचे दिवस नाहीत, तर समाजाला दिशा देणारे महत्त्वाचे दिवस आहेत. आजही अनेक ठिकाणी मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होताना दिसते. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. मुली शिकल्या तर कुटुंब सुशिक्षित होते, कुटुंब सुशिक्षित झाले तर समाज प्रगत होतो आणि समाज प्रगत झाला तर राष्ट्र बळकट होते. त्यामुळे प्रत्येक पालकाने आपल्या मुलीच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. शिक्षण हीच खरी संपत्ती आहे, जी कोणी हिरावून घेऊ शकत नाही. भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा नेहमीच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून शिक्षण, आरोग्य व सामाजिक सशक्तीकरणासाठी कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले. मुलींनी आत्मविश्वासाने शिक्षण घ्यावे, स्वप्ने मोठी ठेवावीत आणि आपल्या कर्तृत्वाने यश मिळवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# 'साऊंड ऑफ द न्यू एरा' मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहमदनगर । रयत समाचार**

येथील नगर जिमखाना क्लबचा व्यवस्थापन हस्तांतरण सोहळा नुकताच दिमाखदारपणे पार पडला. जिमखान्याचे मुख्य व्यवस्थापक अरविंद पारगांवकर व सर्व सन्मानित व्यवस्थापक यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्लोबल मॅनेजमेंट सोल्युशन्सचे संकेत गांधी यांनी व्यवस्थापनाची सूत्रे हाती घेतली.

भविष्यात नगर जिमखाना हे सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक उपक्रमांचे विशेष केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास गांधी यांनी व्यक्त केला. या निमित्ताने नगर जिमखाना व ग्लोबल मॅनेजमेंट सोल्युशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'साऊंड ऑफ द न्यू एरा' ही आंतरराष्ट्रीय गायक पवन श्रीकांत नाईक यांच्या विशेष मैफलीचे




आयोजन करण्यात आले होते. या मैफलीला सभासदांसह सुमारे पाचशे रसिकांनी उपस्थिती लावली. मैफलीत पवन नाईक यांनी प्रसिद्ध हिंदी, पंजाबी व मराठी चित्रपटगीतांचे सादरीकरण करत रसिकांची मने जिंकली. 'अलबेला सजन आयो', 'मितवा', 'किन्ना सोणा', 'झुले झुले लाल', 'तीर्थ विठ्ठल', 'अखीया उडिक दियां', 'सासों की माला पे राम' अशा विविध रचना सादर करत त्यांनी मैफलीला रंगत आणली. पवन नाईक यांना साथसंगतकार म्हणून कल्याण मुरकुटे (संवादिनी), स्मिता राणा (सतार), महेश लेले (व्हायोलिन), कुलदीप चव्हाण (बेंजो), नरेंद्र साळवे (सिंथेसायझर), सुरज शिंदे (तबला), आदित्य मोरे (इलेक्ट्रॉनिक ड्रम) यांनी साथ दिली. सहगायनात श्रेयस शित्रे, पवन तळेकर, मूलांशु परदेशी, नवरतन वर्मा, संगीत ठाकूर, निनाद पारखी, विजय जाधव, ऋषी त्रिवेदी व आश्लेषा मोरे यांनी विशेष रंगत भरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसन्न पाठक यांनी माहितीपूर्ण शैलीत केले.

यावेळी अरविंद पारगांवकर यांनी नगर जिमखान्याच्या सुविधांची माहिती देत सांगितले की, अद्यावत निवास व्यवस्था, भव्य पार्टी लॉन, सभासदांसाठी कौटुंबिक तसेच एम.आय.डी.सी. कंपन्यांच्या विशेष कार्यक्रमांसाठी स्वतंत्र लॉन, लहान मुलांसाठी खेळाचे मैदान व खेळणी पटांगण, भव्य जलतरण तलाव, व्यायाम कक्ष, बिलियर्ड्स, टेबल टेनिस, संगीत विभाग, प्रशस्त भोजन कक्ष व सुसज्ज वाहनतळ अशा सुविधा सभासदांसह शहरवासीयांसाठी खुल्या आहेत.

# स्कूल कनेक्ट : विद्यार्थ्यांना कलाशिक्षण व करिअरविषयी मार्गदर्शन

**अहमदनगर । आबिदखान**

महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण मंडळ, मुंबई आणि कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानाने राबविण्यात येणाऱ्या २०२५-२६ च्या स्कूल कनेक्ट अभियानांतर्गत अहिल्यानगर येथील प्रगत कला महाविद्यालय येथील मान्यवर प्राध्यापकांनी राष्ट्रीय पाठशाळा स्कूल, अहिल्यानगर येथे शैक्षणिक भेट देत इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना कला शिक्षण व कलाक्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत सखोल मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन सत्रात प्रगत कला महाविद्यालयाचे प्रा. नुरील भोसले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ए.टी.डी., इंटेरियर डिझाईन, फाईन आर्ट, शिल्पकला, चित्रकला, पोर्ट्रेट आर्ट अशा विविध कला प्रकारांविषयी सविस्तर माहिती दिली. कला ही केवळ उपजीविकेचे साधन नसून, ती माणसाला मानसिक समाधान, आनंद आणि सुसंस्कृत जीवन जगण्याची प्रेरणा देते, असे त्यांनी सांगितले. कलेचा जीवनाशी असलेला घट्ट संबंध स्पष्ट करताना प्रा. नुरील भोसले यांनी शाळेचे कलाशिक्षक कविराज बोटे यांचे उदाहरण विद्यार्थ्यांसमोर मांडले. कविराज बोटे सर हे उत्कृष्ट ड्रॉइंग शिक्षक असून ते शिल्पकला, चित्रकला आणि पोर्ट्रेट आर्टमध्ये सातत्याने कार्यरत आहेत. शाळेतील जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच त्यांनी कलेची ज्योत अखंड तेवत ठेवली आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेबाहेरही ते कला जोपासण्यासाठी मार्गदर्शन करतात. त्यामुळे त्यांच्या जीवनात कला आणि मूल्यांचा सुंदर समन्वय दिसून येतो. तुम्हाला



खरोखरच एक आदर्श कलाशिक्षक लाभले आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यानंतर विद्यार्थ्यांना फाईन आर्टिस्ट, कमर्शियल आर्टिस्ट, ग्राफिक डिझायनर, इंटेरियर डिझायनर, आर्ट टीचर, इलस्ट्रेटर, ॲनिमेशन, आर्ट डायरेक्शन, आर्ट कंझर्वेशन अशा विविध क्षेत्रांतील करिअर संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कला क्षेत्रातही उज्ज्वल आणि स्थिर भविष्य घडवता येते, हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला. तसेच कलाशिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या नामांकित संस्थांबाबत माहिती देण्यात आली. यामध्ये जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई, सर जे.जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट, सर जे.जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चर तसेच महाराष्ट्रातील विविध शासकीय व अनुदानित कला महाविद्यालयांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम आणि भविष्यातील संधी याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना भविष्यात अधिक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी कला शिक्षण व करिअरविषयक उपयुक्त वेबसाईट लिंक्सही विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. मोबाईलद्वारे घरबसल्या कला शिक्षण, अभ्यासक्रम व प्रवेश प्रक्रियेची माहिती मिळू शकते, असे प्रा. भोसले यांनी स्पष्ट केले.

## ओबीसी आरक्षण कुणाची जहागीरी नाही

# समाज फोडणारे राजकारण महाराष्ट्र खपवून घेणार नाही- तोडमल

**अहमदनगर । रयत समाचार**

ओबीसी आरक्षण हा कुणा एका व्यक्तीचा किंवा समाजघटकाचा नव्हे, तर संविधानाने दिलेला मूलभूत हक्क आहे. मात्र काही राजकीय नेते स्वतः च्या स्वार्थासाठी समाजात जातीय दरी निर्माण करून सामाजिक वातावरण विषारी करण्याचा प्रयत्न करत आहेत. असा प्रकार महाराष्ट्राला मान्य नाही, असा आक्रमक आणि स्पष्ट इशारा स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल यांनी दिला. सावेडी येथे झालेल्या संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीत ते बोलत होते. यावेळी तोडमल म्हणाले, सध्या महाराष्ट्रातील नगरपालिका निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी भाजपकडून कुणबी-मराठा समाजातील पात्र उमेदवारांना डावलण्यात आले. मात्र त्यावेळी समाजाने कुठलीही कटु प्रतिक्रिया दिली नाही. समाजाने नेहमीच मोठे मन दाखवले आहे. तरीही महापालिका निवडणुकांनंतर मराठा समाजाला ओबीसी आरक्षण जाहीर करून, त्याच पक्षातील काही लोकांकडून कुणबी-मराठा समाजाविषयी संशयास्पद व दुटप्पी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ते पुढे म्हणाले, अहमदनगरचे नाव शहाजीनगर करण्याचा प्रश्न असो वा महापालिकेतील सत्तास्थापनेचा मुद्दा असो, मराठा समाजाने नेहमीच संयमाची व विकासाची भूमिका घेतली आहे. महापालिका स्थापन होऊनही पहिला महापौर कुणबी मराठा समाजातील न झाल्याचा कोणताही वाद समाजाने निर्माण केला नाही. मात्र गेल्या तीन-चार वर्षांपासून राज्यभर सभा घेऊन जाणीवपूर्वक समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे चित्र गंभीर आहे. निवडणुकांमध्ये कुणबी मराठा समाजाने भाजप- राष्ट्रवादी युतीला मोठ्या प्रमाणात मतदान केले.



मराठा बहुल भागांतूनही मराठेतर उमेदवार निवडून आले. आरक्षणाचा लाभ घेणारे उमेदवारही सर्वसाधारण जागांवरून उभे राहून मराठा मतांवर निवडून आले. ही लोकशाहीची खरी ताकद आहे. समाजाने कधीही दुजाभाव केला नाही, मग समाजालाच लक्ष्य करून अपमानित करण्याचे राजकारण का, असा सवाल तोडमल यांनी उपस्थित केला. आरक्षणाचा इतिहास मांडताना त्यांनी सांगितले की, २६ जुलै १९०२ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आरक्षणाचा निर्णय घेतला. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात आरक्षणाला घटनात्मक आधार दिला. कुणबी मराठा समाज आधीपासूनच ओबीसी प्रवर्गात आहे आणि आता मराठा समाजालाही ओबीसी आरक्षण देण्यात आले आहे. मग मुद्दाम 'मूळ-कूळ' काढून सामाजिक वातावरण बिघडवण्याचे राजकारण थांबवावे, अशी भूमिका त्यांनी ठामपणे मांडली. मराठा मते घेतल्यानंतर विश्वासघातकी भूमिका घेत समाजाला डावलले, तर ते सहन केले जाणार नाही, असा इशाराही तोडमल यांनी दिला. महाराष्ट्र हा शिव फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांवर चालतो. येथे जातीय द्वेष पसरवणारी विषारी भाषा चालणार नाही. राजकीय नेत्यांनी समाज फोडण्याऐवजी विकासाच्या मुद्द्यांवर बोलावे, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीत संघटनेच्या पुढील वाटचालीबाबत सविस्तर चर्चा झाली. शेतकरी, कष्टकरी आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर आगामी काळात संघटना अधिक आक्रमक भूमिका घेणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# घरकुल लाभार्थ्यांकडून लाखो रुपयांची वसुली

## न्याय न मिळाल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा

**बेलापूर । शफिक बागवान**

केंद्र व राज्य शासनाचे अनुदान मंजूर असतानाही खाजगी कंत्राटदाराला पुढे करून घरकुल लाभार्थ्यांकडून सक्तीने लाखो रुपये घेतले जात असल्याने बेलापूर ग्रामपंचायतीकडून शेकडो लाभार्थ्यांची फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. लेआउट मंजूर नसताना घरकुले उभारली जात असून कोणते घर कोणाला मिळणार हे स्पष्ट नसल्याने लाभार्थी चिंतेत आहेत. सर्वांसमोर चिठ्ठ्या टाकून पारदर्शक पद्धतीने घरकुल वाटप करावे, अशी जोरदार मागणी करत बेलापूर ग्रामपंचायतीचे ज्येष्ठ सदस्य माजी सरपंच महेंद्र साळवी, विद्यमान सदस्य रमेश अमोलिक आणि भरत साळुंके यांनी गावकरी मंडळास 'घरचा आहेर' दिला आहे. ऐनतपूर-बेलापूर येथील गोल्डन वॉटर कृषी पाम येथे निवडक पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ग्रामपंचायतीतील कथित गैरकारभाराची पोलखोल केली. यावेळी श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, बेलापूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व ज्येष्ठ सदस्य रवींद्र खटोड, पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्ता कुऱ्हे, ऐनतपूर सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत पाटील नाईक, बेलापूर सोसायटीचे माजी चेअरमन राजेंद्र सातभाई, पंडितराव बोंबले, सुधाकर खंडागळे, हरिहर फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम नाईक, शिवाजीराव पाटील वाबळे, ज्ञानदेव नाना वाबळे, आयाज शेख आदी उपस्थित होते. यावेळी रमेश अमोलिक म्हणाले, ग्रामपंचायतीच्या बैठकीत उपस्थित असल्याबाबत सह्या घेतल्या जातात. मात्र काही सदस्यांकडून त्याचा गैरवापर करून आमच्या सह्या दाखवून बनवाबनवी केली जाते.

लेआउट मंजूर नाही तसेच कोणती घरे कोणाला मिळणार याची माहिती कोणालाही देण्यात आलेली नाही. तरीही लाभार्थ्यांना दमदाटी करून प्रत्येकी १ लाख ३५ हजार रुपये घेतले जात आहेत. ही रक्कम कोट्यवधी रुपयांपर्यंत जात असून घेतलेल्या पैशांच्या पावत्याही दिल्या जात नाहीत. हरेगाव येथील एका ठेकेदाराला ग्रामपंचायतीत आणून हे पैसे जमा केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. भरत साळुंके म्हणाले, शासनाच्या कडक सूचनांनुसार लेआउट मंजूर नसताना घरकुले बांधणे नियमबाह्य आहे. अटी-शर्तींचा भंग झाल्यास ही जमीन शासनाकडे परत जाऊ शकते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले असतानाही ग्रामपंचायत घरकुले उभारण्याचा अट्टाहास करत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बेलापूरला जमीन उपलब्ध करून दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके कमी आहेत. मात्र ग्रामपंचायतीच्या कारभारामुळे गरीब लाभार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून ही भूमिका मांडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महेंद्र साळवी म्हणाले, घरकुल लाभार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून आपण गेल्या अनेक महिन्यांपासून संघर्ष करत आहोत. लाभार्थ्यांकडून बळजबरीने मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा होत असून याबाबत न्याय न मिळाल्यास न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्यात येतील. गरज पडल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी सभापती सुधीर नवले म्हणाले, घरकुल योजनेला आमचा कोणताही विरोध नाही. मात्र कोणते घर कोणाला मिळणार आहे आणि लाभार्थ्यांकडून सक्तीने पैसे कोण व कशासाठी घेत आहे, याचा स्पष्ट खुलासा व्हावा. अन्यथा चांगली योजना बदनाम होण्याची भीती आहे.



### घरचा आहेर

**महेंद्र साळवी आणि रमेश अमोलिक हे बेलापूर ग्रामपंचायतीत सत्तेत असलेल्या गावकरी मंडळाचे सदस्य आहेत. घरकुला संदर्भात त्यांनी घेतलेल्या आक्षेप संदर्भात गावकरी मंडळास हा घरचा आहेर मानला जात आहे. घरकुला चे हे प्रकरण जिल्हाधिकाऱ्यापर्यंत गेल्याने गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे येत्या एक-दोन दिवसात बेलापूरला येण्याची चर्चा असून ग्रामपंचायतीत उद्योग करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची विखे कशी कान उघडनी करतात याकडे गावाचे लक्ष लागले आहे.**

### वाळू विकली

**घरकुल लाभार्थ्यास शासनाकडून वाळू मोफत आहे. ग्रामपंचायतीने लाभार्थ्यांच्या मोबाईलचे ओटीपी जमा करत त्यांना मिळणारी वाळू ही परस्पर विकली असल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. यामुळे ग्रामपंचायतीची पूर्ण नाचक्की झाली आहे. गावात ही चर्चा रंगली आहे.**

# समाजाची जनजागृती पत्रकारांच्या हातात; पत्रकारांकडूनच न्यायाची अपेक्षा- नवले



**बेलापूर । शफिक बागवान**

समाजाची जनजागृती पत्रकारांच्या हातात आहे. समाजाला न्याय मिळण्याची अपेक्षा आज फक्त पत्रकारांकडूनच असल्याचे स्पष्ट प्रतिपादन श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांनी केले. श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती आणि बेलापूर बुद्रुक विविध कार्यकारी सहकारी सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ऐनतपूर येथील गोल्डन वॉटर कृषी पाम येथे पत्रकार दिनानिमित्त आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजीराव पाटील वाबळे होते. नवले म्हणाले, व्हॉट्सअ‍ॅप, युट्यूब तसेच प्रिंट मीडियावरील पत्रकारिता आज जोमाने वाढत आहे. समाजाची पत्रकारांकडून मोठी अपेक्षा असून ती पत्रकारच पूर्ण करू शकतात. यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती संतोष कुरहे, भरत साळुंके, ज्ञानेश्वर गवले, देविदास देसाई यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी पत्रकार बाळासाहेब भांड, हाजी शफीक बागवान, संदीप आसने, महेश माळवे, करण नवले, जयेश सावंत, शिवाजी पवार, वैभव जगताप, प्रदीप आहेर, महेश रक्ताटे, रमण मुथा, शफीक शेख, रणजीत श्रीगोड, विष्णुपंत डावरे, सुनील नवले, नवनाथ कुताळ, शरद पुजारी, अतिश देसरडा, अशोक गाडेकर, अनिल पांडे, दिलीप दायमा, सुहास शेलार, गोविंद साळुंखे, अभिजीत राका आदी पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास जनता आघाडीचे अध्यक्ष रवींद्र खटोड, माजी सरपंच भरत साळुंके, संस्थेचे चेअरमन किशोर नवले, व्हा. चेअरमन अंतोन अमोलिक, माजी चेअरमन राजेंद्र सातभाई तसेच पंडितराव बोंबले, ज्ञानदेव पा. वाबळे, दत्ता कुहे, राजेश खटोड, प्रमोद कर्डिले, विक्रम नाईक, भास्कर बंगाळ, रमेश अमोलिक, सुधाकर खंडागळे, काशिनाथ गाढे, अनिल नाईक, बाळासाहेब लगे, विशाल अनिल पवार, जाकिर शेख, विजय शेलार, अय्याज शेख, सुरेश कुहे, अल्ताफ शेख, अनिल नवले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गवले यांनी केले. उपस्थितांचे आभार शेषराव पवार यांनी मानले.

# हृदयविकाराच्या झटक्यात तात्काळ सीपीआर देणे गरजेचे- डॉ. शिरसाठ

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

भारतामध्ये दरवर्षी सुमारे ७० लाख नागरिक हृदयविकाराच्या झटक्याने दगावतात. यापैकी ७० टक्के मृत्यू घरात, २० टक्के सार्वजनिक ठिकाणी तर १० टक्के हॉस्पिटलमध्ये होतात. अशा स्थितीत एखाद्या व्यक्तीस हृदयविकाराचा झटका आल्यास तात्काळ सीपीआर देणे अत्यंत आवश्यक असून त्यामुळे रुणाचे प्राण वाचू शकतात, असे आवाहन प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. दिलीप शिरसाठ यांनी केले. इंडियन रेड क्रॉस सोसायटी, श्रीरामपूर यांच्या वतीने बस स्थानक व रेल्वे स्थानकावर बस-रेल्वे कर्मचारी तसेच प्रवाशांना सीपीआर देण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी डॉ. दिलीप शिरसाठ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. शिरसाठ म्हणाले, सीपीआर देताना डावा व उजवा हाताचे तळहात एकत्र करून छातीवर दाब द्यावा. साधारण एका मिनिटात १०० ते १२० वेळा दाब द्यावेत. प्रत्येक ३० दाबांनंतर एक कृत्रिम श्वास रुणाला देणे आवश्यक आहे. अत्यावश्यक सेवा उपलब्ध होईपर्यंत सीपीआर सुरू ठेवल्यास रुण वाचण्याची शक्यता वाढते. सध्या हृदयविकाराचा झटका कुठेही व कोणालाही येऊ शकतो. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी पुढील तीन गोळ्यांचे छोटे पाकीट ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यात टॅब. डिस्प्रिन अर्धी गोळी चावून घेणे, टॅब. सॉर्बिट्रेट (५ मि.ग्रॅ.) जिभेखाली ठेवणे आणि टॅब. अटोरव्हास्टॅटिन (४० मि.ग्रॅ.) एक गोळी घेणे हे गरजेचे आहे यावेळी डॉ. शिरसाठ यांनी बस स्थानक व रेल्वे स्थानकावर उपस्थित कर्मचारी आणि प्रवाशांना सीपीआरचा प्रत्यक्ष डेमोही दिला. सार्वजनिक ठिकाणी प्रथमच अशा प्रकारचे प्रशिक्षण मिळाल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. तसेच रेडक्रॉस सोसायटीच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रांताधिकारी किरण सावंत, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, शिवा ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पवार, सुनील साळवे, डेपो मॅनेजर अनिल बेहेरे, रेल्वे मॅनेजर एम. पी. पांडे, आत्माराम काळे, प्रशांत संसारे, राजेंद्र खंडीझोड, अनिल पठारे, भीमा फुंदे, किशोर सोसे, श्रावण भोसले, पोपटराव शेळके, सुखदेव शेरे, सचिन चंदन, सुभाष बोधक, अरुण कटारे, बन्सी फ `रवानी, केशव धायगुडे, सुरंजन साळवे, सुरेश वाघुले, मेतकर, स्वाती पुरे, पुष्पा शिंदे, निर्मला लांडगे आदींसह शरदचंद्रजी पवार होमिओपॅथी कॉलेज व सुप्रिया दीदी कॉलेज ऑफ नर्सिंग, वडाळा महादेव येथील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.




# महाआरोग्य तपासणी शिबिर व हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न

**पाथर्डी । नितिन गटाणी**

पाथर्डी सारख्या ग्रामीण भागातून सुरुवात करून अहिल्यानगर जिल्ह्यात सहकार क्षेत्रात अल्पावधीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विश्वविनायक मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने ५१ कोटी रुपयांच्या यशस्वी बिझनेस प्रवासाचा टप्पा पूर्ण केला. या निमित्ताने संस्थेच्या वतीने मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर व संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सहकार क्षेत्रात कमी वेळात स्वतः ची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या विश्वविनायक मल्टीस्टेटला विविध मानाचे पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. संस्थेने आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये नेहमीच पारदर्शक कामकाज केल्याचे यावेळी सांगण्यात आले. ग्राहकांच्या सहकार्य आणि विश्वासाच्या बळावरच संस्थेला अल्पावधीत ५१ कोटी रुपयांचा बिझनेस पूर्ण करणे शक्य झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमांतर्गत संस्थेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मोदक शहाणे, बाळासाहेब जिरेसाळ, सुनील शहाणे, दिनकर बढे आदी उपस्थित होते. या तपासणी शिबिरामध्ये सुमारे ८ हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विविध तपासण्या पूर्णतः मोफत करण्यात आल्या. या शिबिरात पाचशेहून अधिक रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विशेषतः महिला भगिनींचा या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरासाठी डॉ. अनिल उदावंत व त्यांच्या तज्ज्ञ सहकाऱ्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. दरम्यान, संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त विश्वविनायक फाउंडेशनच्या वतीने माता-भगिनींसाठी आकर्षक हळदी-कुंकव कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पाथर्डी नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष मंगला कोकाटे व गटनेत्या डॉ. शारदा गर्जे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आभार गायत्री शहाणे यांनी मानले.



### ५०० कोटींच्या दिशेने वाटचाल शहाणे

**या प्रसंगी बोलताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोदक शहाणे म्हणाले की,पाथर्डीकरांच्या विश्वासावर उभी राहिलेली विश्वविनायक मल्टीस्टेट भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कार्यामुळे ओळखली जाईल.आज ५१ कोटींचा टप्पा गाठला असून, येत्या काळात ५०० कोटींच्या बिझनेसचे लक्ष्य पूर्ण करून खातेदारांसाठी अधिक सुविधा उपलब्ध करून देऊ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**



# श्रीराम मंदिरात २१ गणपती अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

श्रीराम मंदिर, मेन रोड येथे २२ जानेवारी २०२६ रोजी २१ गणपती अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम अतिशय मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी सौ. वैशाली व सागर चापानेरकर यांना श्री गणेशाला अभिषेक व पूजा करण्याचा मान लाभला. पौराहित्य श्री. वाडेकर गुरुंनी केले. अथर्वशीर्ष पठणाचे व्यासपीठ श्रीमती सुजाता मालपाठक व श्रीमती वर्षा आगाशे यांनी सांभाळले. कार्यक्रमाची सांगता आरतीने करण्यात आली. प्रसादाचा मान जितेंद्र जनार्दन गिरमे यांना मिळाला. तसेच भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सौ. तारा उपाध्ये यांनी केली. मंदिराच्या अध्यक्षा श्रीमती प्रणिता गिरमे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सुबद्धपणे पार पडला. पोद्दार महाले स्कूलच्या विद्यार्थिनींचीही कार्यक्रमास उपस्थिती होती. यावेळी श्रीमती सूर्यवंशी, विश्वस्त रोनक गिरमे, विश्वस्त सौ. वैशाली गिरमे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी श्री. वाडेकर गुरु, श्री. देहाडराय, श्री. नरवणे, ओम शिंदे आदींचे सहकार्य लाभले.

# मनसेच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी अविनाश पालवे

**पाथर्डी । नितिन गटाणी**

तालुक्यातील शिरसाटवाडी गावचे सरपंच तथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अविनाश पालवे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांची अधिकृत नियुक्ती केली. शिरसाटवाडी ग्रामपंचायतची निवडणूक स्वबळावर लढवत नगर जिल्ह्यातील मनसेचे एकमेव लोकनियुक्त सरपंच तसेच पूर्ण बहुमतातील सत्ताधारी सरपंच अशी पालवे यांची ओळख आहे. आपल्या कामाच्या माध्यमातून त्यांनी जनमानसात स्थान निर्माण केले आहे. मनसेच्या स्थापनेपासून ते पक्षात सक्रिय व एकनिष्ठ असून मनसे विद्यार्थी सेना तालुकाध्यक्ष, परिवहन सेना जिल्हाध्यक्ष, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष या पदांवर त्यांनी यशस्वीपणे काम केले आहे. नव्या जबाबदारीबाबत प्रतिक्रिया देताना अविनाश पालवे म्हणाले, पाथर्डी, शेवगाव, कर्जत, जामखेड या भागांत लवकरच बैठका घेऊन नव्या-जुन्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्षाची नव्याने बांधणी केली जाईल. आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुका ताकदीने लढवण्यात येतील. तसेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे, नेते अमित ठाकरे, मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे आणि नेते बाळा नांदगावकर यांनी जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देऊन जो विश्वास दाखवला आहे, तो पक्षबांधणी व पक्षवाढीतून निश्चितच सार्थ ठरवू, असेही त्यांनी स्पष्ट केले.





# एनएसएसचे सात दिवसांचे निवासी शिबिर

**पिंपळगाव माळवी । रयत समाचार**

हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शनिवार दि. २४ रोजी नगर तालुक्यातील दत्तक गाव पिंपळगाव माळवी येथे सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी होते. यावेळी बोलताना डॉ. कोठारी म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, जबाबदारीची भावना निर्माण व्हावी तसेच सुजाण नागरिक घडावेत.

या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना गावकऱ्यांसोबत ग्रामविकासाच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी होता येणार आहे. प्राचार्य प्रा. डॉ. माहेश्वरी गावित यांनी शिबिरातून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या व्यावहारिक अनुभवाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास सरपंच राधिका प्रभुणे, ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब झिने, संगीता झिने, सागर शिंदे, प्रबंधक अशोक असेरी, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. कृष्णा पाटील, प्रा. शैलेश देशमुख, डॉ. प्रकाश जाधव, प्रा. अनिल झिने, डॉ. नवनाथ भोंदे, डॉ. नीलिमा विखे, प्रा. श्रेया घोरपडे, प्रा. सुमन सिंग आदी मान्यवर उपस्थित होते. आभार डॉ. ज्योती बिडलान यांनी मानले. हे शिबिर दि. २४ ते ३० जानेवारीपर्यंत चालणार असून यामध्ये स्वच्छता मोहीम, आरोग्य जागृती, वृक्षारोपण, ग्रामसेवा, रक्तदान शिबिर तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आदी विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

# भारत बलशाली होईल

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही राष्ट्रीय सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्याला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या गुलामीतून भारत स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाचे कायदे हे भारतीयराज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर (कलमावर) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम व कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते.



हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे आव्हान करण्यात आले. तेव्हा देशाचे संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमण्यात आली. या संमतीने संविधानाचा मसुदा तयार करून तो ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सभेपुढे सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने दोन वर्ष, अकरा महिने आणि अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यावर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले.

संविधानाने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल !



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# टेंभी डोंगरावरील शिवमल्हार गडावर अभिनेते सयाजी शिंदेंची भेट

## पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार



**नगर तालुका । रयत समाचार**

नगर शहरापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावरील पिंपळगाव माळवी येथील टेंभी डोंगरावरील ऐतिहासिक शिव मल्हार गडावर शनिवार दि. २४ रोजी मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांनी भेट दिली. गडावरील निसर्गसौंदर्य आणि शांत वातावरण पाहून ते प्रसन्न झाले. यावेळी त्यांनी या ठिकाणी 'सह्याद्री देवराई' प्रकल्प राबवून वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धनाचा मोठा उपक्रम हाती घेण्याचा मानस व्यक्त केला. या भेटीदरम्यान खंडोबा देवस्थान ट्रस्टचे योगेश झिने, अमोल जाधव, पुजारी नितीन झिने यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सयाजी शिंदे यांनी गडाचे ऐतिहासिक महत्त्व आणि निसर्गसंपदा यांचे कौतुक करत ग्रामस्थांशी विविध विषयांवर चर्चा केली. पिंपळगाव माळवी येथील टेंभी डोंगरावर असलेल्या शिवकालीन खंडोबा मंदिराचा ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून जीर्णोद्धार केला आहे. मंदिराचा कलश, रंगरंगोटी तसेच इतर दुरुस्तीची कामे पूर्ण झाली आहेत. डोंगरावर पाण्याची योग्य व्यवस्था झाल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या एकजुटीचे हे उत्तम उदाहरण ठरले असून स्थानिक धार्मिक व पर्यावरणीय वारसा जपण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# हळदीकुंकू कार्यक्रमातून मातृत्वाचा सन्मान

**सोनई । विजय खंडागळे**

नेवासा तालुक्यातील माका येथील राजश्री शाहू महाराज माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात हळदीकुंकू व मातृपूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्यालयाचे प्राचार्य जे. आर. शेटे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने माता-भगिनी उपस्थित होत्या. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी माता-भगिनींवर फुले उधळून त्यांचे स्वागत केले. विद्यालयाच्या अध्यापिका सौ. हंडाळ यांनी हळदीकुंकू कार्यक्रमाचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व सांगून सविस्तर माहिती दिली. यावेळी प्रत्येक सौभाग्यवतीने उखाण्यातून स्वतःची ओळख करून देत कार्यक्रमात रंगत आणली. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्या मातांचे विधीपूर्वक मातृपूजन केले. या प्रसंगी अनेक मातांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले असून वातावरण भावनिक झाले होते. यानंतर संगीत खुर्चीचा कार्यक्रम घेण्यात आला. उपस्थित महिलांना 'करवंडा' हे वाण देण्यात आले तसेच अल्पोपहारही देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. एस. वाघ यांनी केले. आभार शिक्षक एम. आय. एडके व एस. डी. नन्नवरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयात इंटरॲक्टिव्ह पॅनलचे उद्घाटन

## पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

येथील श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय येथे विद्यार्थीपालकशिक्षक प्रबोधन संवाद मेळावा नुकताच उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष घन:श्याम आण्णा शेलार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे निरीक्षक प्रा. विलासराव जाधव उपस्थित होते.। यावेळी घन:श्याम आण्णा शेलार यांनी पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, विद्यार्थी ही पालकांची खरी संपत्ती असून पालकांनी मुलांवर चांगले संस्कार करावेत. कुटुंबात शैक्षणिक वातावरण निर्माण करून पाल्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आवश्यक आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांवर होणाऱ्या विपरीत परिणामांबाबत या मेळाव्यात सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी संस्थेचे निरीक्षक प्रा. विलासराव जाधव, श्री अजीमभाई जकाते, सौ. सुहासिनी खेतमाळीस, सौ. सोनाली डांगे, सौ. वर्षाताई खेतमाळीस, राजू जकाते, सौ. पद्मिनी महारनवर, सौ. ज्योतीताई गजरमल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास व्यासपीठावर श्री बाळासाहेब शेलार, सौ. मनीषाताई शेलार, डॉ. सौ. सुनिता वडवकर, सौ. मीनलताई भिंताडे, सौ. मृणालीताई शेलार, आण्णा मोटे पाटील, शामकाका खेतमाळीस, सरपंच मिलिंद कदम, गणेश सांगळे, सौ. राणीताई दहातोंडे, सौ. शुभांगीताई भानुसे, प्रा. समीर पांढरकर आदी मान्यवर उपस्थित होते. या संवाद मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात रसिकलाल धारिवाल ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने शाळेला प्राप्त झालेल्या इंटरॲक्टिव्ह पॅनलचे उद्घाटन घन:श्याम आण्णा शेलार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष जामदार यांनी केले. सूत्रसंचालन भुजबळ वाय. के. यांनी केले, तर आभारप्रदर्शन हावलदार एम. एस. यांनी मानले. शेवटी स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# जायन्ट्स मेनचा स्तुत्य उपक्रम

## रुग्णांना उबदार कपड्यांचे वाटप

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या बेळगाव जाएन्ट्स ग्रुप ऑफ मेन यांच्यावतीने गुरुवारी जिल्हा रुग्णालयातील प्रसूती विभागातील गरोदर महिलांना स्वेटर आणि कानटोप्यांचे वितरण करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील महिला वॉर्डात वैद्यकीय अधीक्षक डॉ. इराण्णा पल्लेद, रिजनल मेडिकल ऑफिसर डॉ. उदपुडी यांच्या उपस्थितीत स्वेटर व कानटोप्यांचे वितरण करण्यात आले. जाएन्ट्स मेन वतीने राबविण्यात आलेल्या आजच्या सामाजिक उपक्रमाबद्दल डॉ. पल्लेद यांनी आभार मानले. यावेळी जाएन्ट्स मेनचे आकाश लाटुकर, प्रशांत मेलगे, राहूल बेलवलकर, फेडरेशन ऑफिसर सुनिल मुतगेकर, संजय पाटील, अरुण काळे, उमेश पाटील, विजय बन्सूर, आनंद कुळकर्णी, अविनाश पाटील, वाय. एन. पाटील, सचिव विश्वास पवार, प्रकाश तांजी, अशोक हलगेकर, संजय सूर्यवंशी, मोहन पत्तार आदी सदस्य उपस्थित होते.

# मार्क टली : पत्रकारिता पर्वाची अखेर !




भारतीय पत्रकारितेत मार्क टली यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. बीबीसी हिंदीसाठी त्यांनी केलेले वार्तांकन अनेकांच्या लक्षात आहे. बीबीसी रेडिओ ऐकणे ही हजारो लोकांची नियमित सवय होती. विदेशी वंशाचे ब्रिटिश नागरिक असले तरी भारतात राहून ते पूर्णपणे येथील जनजीवनाचा भाग झाले. भारतीयत्वाचे मूर्त स्वरूप बनलेल्या पत्रकार मार्क टली यंनी भारतीय पत्रकारितेत आपला वेगळा ठसा उमटवला. खरे तर मार्क टली यांना पत्रकारिता क्षेत्रात यायचे नव्हते. पण ते योगायोगाने आले आणि एक कुशल पत्रकार बनले. सुरुवातीला त्यांना ओळख मिळवून देण्यात फारसा उत्सुक नसलेला भारत त्यांचे कायमचे घर बनला. भारतात त्यांना मिळालेल्या आदराने ते खूप नम्र झाले. त्याकाळी बीबीसी बातम्यांसाठी एक विश्वासार्ह स्रोत मानला जात असे. मार्क टली यांनी संपूर्ण भारतात प्रवास केला. हा देश खूप सुंदर आहे आणि पत्रकारिता हे माझे नशीब आहे हे माझ्यासाठी आश्चर्य आहे, असे उद्गार त्यांनी नोंदवून ठेवले आहेत. मार्क टली यांचा जन्म १९३५ मध्ये कोलकाता येथे एका यशस्वी व्यावसायिकाच्या घरी झाला. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापूर्वीही त्यांचे पूर्वज तिथे राहत होते. त्यांचे पणजोबा पूर्व उत्तर प्रदेशात अफूचे व्यापारी होते आणि त्यांचे आजोबा ज्यूटचे व्यापारी होते. त्यांच्या आईचा जन्म आताच्या बांगलादेशात झाला होता. त्यांचे जीवन ब्रिटिश नागरिकासारखे होते. एका मुलाखतीत मार्क टली यांनी म्हटले आहे की, त्यांना भारताची ओळख पटवण्याची अजिबात परवानगी नव्हती. त्यांना भारताच्या संस्कृतीचा भाग बनण्यास मनाई होती. त्यांच्या युरोपियन आया त्यांना हिंदी किंवा इतर भाषा शिकण्यास मनाई करत होत्या आणि त्यांनी फक्त इंग्रजी बोलण्याचा आग्रह धरला होता. जरी मार्क टली इंग्रजी आत्मसात करणाऱ्या भारतीय वातावरणात वाढले असले तरी, त्यांना लहानपणापासूनच भारताबद्दल प्रेम होते. मार्क टली हे एकेकाळी चर्चमध्ये फादर बनण्याची आकांक्षा बाळगत होते.त्यासाठी त्यांनी धर्मशास्त्रात पदवी देखील मिळवली होती. तथापि, नंतरच्या घटना बदलल्या आणि त्यांना भारतात परतावे लागले. १९७५ मध्ये, आणीबाणीच्या काळात, मार्क टली ४० परदेशी पत्रकारांसह भारत सोडून गेले. ते लंडनला परतले. आणीबाणी संपल्यानंतर ते बीबीसीचे ब्युरो चीफ म्हणून भारतात परतले. तेव्हापासून ते भारतात राहत होते. त्यांनी ''नो फुल स्टॉप्स इन इंडिया'' आणि ''इंडिया इन स्लो मोशन'' यासह अनेक मनोरंजक पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे नवीनतम पुस्तक, ''अपकंट्री टेल्स: वन्स अपॉन अ टाइम इन द हार्ट ऑफ इंडिया'' हे लघुकथांचा संग्रह आहे. भारत सरकारने त्यांना १९९२ मध्ये पद्मश्री आणि २००५ मध्ये पद्मभूषण देऊन सन्मानित केले. मानवी चेहऱ्याची पत्रकारिता करणारा एक संवेदनशील पत्रकार आज २५ जानेवारी २०२६ रोजी हे जग सोडून गेला आहे. मार्क टली यांच्या निधनाने पत्राकारितेचे एक पर्व संपले आहे. मार्क टली यांनी केवळ पत्रकारितेतच नव्हे तर वैचारिक लेखनातही एक आदर्श निर्माण केला. सतीश जेकब यांच्यासोबत सहलेखित केलेले त्यांचे पुस्तक, ''अमृतसर : इंदिरा गांधीज लास्ट बॅटल'' हे अतिशय तथ्यात्मक आणि प्रामाणिक लेखन आहे. पत्रकारितेचे एक उज्ज्वल उदाहरण असलेल्या या थोर पत्रकाराला श्रद्धांजली!



**प्रभाकर ढगे**
९३७३०२१५८४
समुह संपादक,
रयत समाचार, पणजी, गोवा.

**स्मृतिवार्ता**

# जीएसटी करप्रणाली म्हणजे व्यापाराचा समृद्धी महामार्ग- काले

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**



अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जसा समृद्धी महामार्ग किंवा नव्याने विकसित होणाऱ्या एक्सप्रेस वेवर विनाअडथळा व स्वनियंत्रित वाहतूक व्यवस्था उभारण्यात आली आहे, त्याच धर्तीवर जीएसटी कर प्रणाली विकसित करण्यात आली असून जीएसटीआयएन प्लॅटफॉर्ममुळे व्यापार अधिक पारदर्शक, सुलभ व सुरक्षित झाला आहे, असे प्रतिपादन विक्रीकर न्यायाधिकरणाचे माजी सदस्य समीरकुमार काले यांनी केले. श्रीरामपूर मर्चंट असोसिएशन, टॅक्स बार असोसिएशन व तालुका सिडस्, पेस्टीसाईडस् ॲण्ड फर्टिलायझर्स डिलर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जीएसटी मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. यावेळी चार्टर्ड अकाउंटंट दिनेश बुरड, आमदार हेमंत ओगले व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष राहुल कोठारी, अनिल लुल्ला, संजय कासलीवाल, नंदू कोठारी, सुभाष बिहाणी, मानसी नाईक, विजय कोळसे, राहुल उंडे, बाबासाहेब हुरुळे, चेतन औताडे, श्रीधर कोलते यांच्यासह निलेश बोरावके, निलेश नागले, प्रविण गुलाटी, धर्मेश शाह, स्वप्नील चोरडिया, योगेश ओझा, संदिप अग्रवाल, ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी यांची प्रमुख उपस्थिती होती. काले म्हणाले की, जीएसटीआयएन ही संपूर्ण देशातील व्यापाराची एकसंध डिजिटल व्यवस्था असून ई-इन्व्हाईसिंग, क्यूआर कोड व आयएमएस प्रणालीमुळे सर्व देयके संगणकीय प्रणालीवर नोंदविली जात आहेत. एकदा डेटा एन्ट्री झाल्यानंतर रिटर्न्समध्ये सर्व माहिती आपोआप भरली जाते. खरेदीवरील कराची वजावट (आयटीसी) देयकांच्या पडताळणीनंतरच उपलब्ध होत असल्याने चुकीचे किंवा खोटे देयके सादर करणे शक्य राहिलेले नाही. देयके व रिटर्न्स अपलोड होण्यापूर्वीच सर्व व्यवहारांची सत्यता तपासली जात असल्याने पुढे नोटिसा, तपासणी किंवा चौकशीची गरज उरत नाही. त्यामुळे प्रामाणिक करदात्यांचा वेळ अनुपालनामध्ये वाया न जाता ते आपल्या व्यवसायाच्या वाढीकडे अधिक लक्ष देऊ शकतात. कर प्रशासनाचा उद्देश नियमबाह्य व्यवहार करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करणे हाच असून प्रामाणिक करदात्यांना कोणताही त्रास दिला जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले. ५६ व्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत घेतलेले निर्णय सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करून घेण्यात आले आहेत. शेती, आरोग्य व जीवनावश्यक क्षेत्रांना सवलती देण्यात आल्या असून लघु व मध्यम उत्पादकांना व्यवसायवृद्धीसाठी दिलासा देण्यात आला आहे. कर प्रणाली सुलभ करण्यासाठी १२ व २८ टक्के स्लॅब रद्द करून पाच व १८ टक्के असे दोन मुख्य स्लॅब ठेवण्यात आले आहेत. यामुळे अनेक जीवनावश्यक वस्तू स्वस्त झाल्या असून पॅकबंद खाद्यपदार्थ, नमकीन, सॉस, नूडल्स, कॉफी, बटर व तूप या वस्तू पाच टक्के कराच्या कक्षेत आणण्यात आल्या आहेत. कार, सिमेंट व ऑटो पार्टसवरील कर १८ टक्के करण्यात आला आहे. दारू व इतर लक्झरी तसेच हानिकारक वस्तूंवर ४० टक्के विशेष कर लागू करण्यात आला आहे. अक्षय ऊर्जा उपकरणांवरील कर १२ टक्क्यांवरून पाच टक्के करण्यात आला असून छोट्या कार व १२०० सीसीपेक्षा कमी क्षमतेच्या वाहनांवर कर कमी करण्यात आला आहे. या शिबिरात चार्टर्ड अकाउंटंट दिनेश बुरड यांनी जीएसटी कर प्रणालीबाबत सविस्तर माहिती देत प्रेझेंटेशनद्वारे व्यापारी व कर सल्लागारांच्या शंकांचे निरसन केले. आमदार हेमंत ओगले यांनी काटा वजन माफ संदर्भातील अडचणी असल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहन करून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कासलीवाल यांनी केले. प्रास्ताविक प्रवीण गुलाटी यांनी केले तर आभार दत्ता धालपे यांनी मानले. कार्यक्रमास व्यापारी संघटनांचे पदाधिकारी, सदस्य, कर सल्लागार व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निमगाव वाघात पाचवे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

**नगर । रयत समाचार**



छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे पाचवे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने येत्या १९ फेब्रुवारी रोजी गावातील परिवार मंगल कार्यालयात हा सोहळा होणार आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराने गौरविण्यात येणार असून, पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन संमेलनाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी केले आहे.. या साहित्य संमेलनात नवोदित तसेच ज्येष्ठ साहित्यिक, कवी आणि साहित्यप्रेमींचा सहभाग असणार आहे. यामध्ये शाहीरांकडून पोवाड्यांचे सादरीकरणही करण्यात येणार आहे. तसेच जयंती उत्सवाच्या कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, धार्मिक, साहित्य, वैद्यकीय तसेच पर्यावरण संवर्धन या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व सामाजिक संस्थांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. या संमेलनात संत गाडगे महाराज शिक्षक रत्न पुरस्कार, संत गाडगे महाराज साहित्य रत्न पुरस्कार, संत गाडगे महाराज समाजरत्न पुरस्कार, संत गाडगे महाराज आदर्श सरपंच पुरस्कार, शिवछत्रपती गुणवंत शिक्षक पुरस्कार, शिवछत्रपती समाजरत्न पुरस्कार तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारांसाठी दि. ५ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव पाठवायचे असून, प्रस्ताव स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था कार्यालय, पै. नाना डोंगरे, अध्यक्ष, निमगाव वाघा, ता. नगर, जि. अहिल्यानगर ४१४००५ या पत्त्यावर पाठवावेत, असे कळविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९२२६७३५३४६ व ८६०५७७५२६१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.